MHST110000592020

# फौ. कि. अर्ज क्र.१३/२०२० मधील निशाणी क्र.३ खालील आदेश

सदरचा अर्ज अर्जदार यांनी सामनेवाला विरुध्द तूर्तातूर्त पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार हिचे कथन की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा प्रेमविवाह दि.२२.०१.२०१५ रोजी गिरगांव, मुंबई येथे अर्जदार यांचे घरातील लोकांचे इच्छेविरुध्द झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार ही मौजे वयगांव, ता. वाई येथे नांदण्यास गेली. सामनेवाला क्र.२ ही लग्नामध्ये हुंडा, मानपान काही मिळाला नाही म्हणून अर्जदार हिला त्रास देऊ लागली. तसेच, लग्नामध्ये तुझ्या आईवडीलांना काहीच खर्च झाला नाही, काही हुंडा दिला नाही, त्यामुळे माहेरहून पाच लाख रुपये घेऊन ये, तरच नांदावयास ये, अन्यथा तु तुझ्या माहेरी परत जा, माझ्या मुलाला चांगल्या व मोठया घरच्या मुली सांगून आल्या होत्या असे म्हणून सामनेवाला क्र.२ अर्जदार हिस शारिरीक व मानसिक त्रास देऊ लागली. तसेच, घरातील सर्व कामे करावयास लावून शिळे अन्न खायला देत व कधीकधी उपाशी ठेवत होती.

३. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला क्र.१ हा लोअर परेल, मुंबई येथे प्रिंटीग प्रेसमध्ये नोकरी करत असताना कोपरखैरणे, नवी मुंबई येथे भाडेतत्वावर खोली भाडयाने घेवून अर्जदार हिला तेथे राहण्यास आणले. अर्जदार ही सामनेवाला क्र.१ याचे ऐकत नाही म्हणून अर्जदार हिस शिवीगाळ करुन मारहाण करु लागला. सामनेवाला क्र.१ यास दारुचे प्रचंड व्यसन असून तो रोज दारु पिऊन अर्जदार हिस घाणेरडी शिवीगाळ करुन प्रचंड मारहाण करत असे. अर्जदार हिने नोकरी करण्यास नकार दिल्याने सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिचे चारित्र्यावर संशय घेऊ लागला.

४. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला क्र.१ हा रात्री उशिरापर्यंत मोबाईलवर बोलत असल्याने व चॅटींग करत असल्यामुळे अर्जदार हिने विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली. अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ याचा मोबाईल पाहिला असता त्याचे अन्य महिलांशी घाणेरडे मेसेज, फोटो असल्याचे निदर्शनास आले. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिस घरखर्चासाठी पैसे देत नसत व त्याच्या पगाराची संपूर्ण रक्कम ऐशआरामासाठी खर्च करत होता. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिस ऑगस्ट २०१७ मध्ये दारु पिऊन प्रचंड मारहाण व शिवीगाळ केली व माहेरी हाकलून दिले. अर्जदार तेव्हापासून सुमारे दोन वर्षापासून नाईलाजारे माहेरी रहात आहे.

५. अर्जदाराचे पुढे कथन की, अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ यास नांदवण्यास घेवून जाण्याची विनंती करुनही सामनेवाला याने नांदवण्यास नेले नाही. सामनेवाला क्र.२ हिने अर्जदार हिला फोन करुन घटस्फोटाची मागणी केली व तुला आम्ही नांदवणार नाही असे सांगितले. सामनेवाला क्र.१ याने दि.०१.०२.२०२० रोजी अर्जदार हिला तिच्या मोबाईलवर घाणेरडे मेसेज करुन शिवीगाळ केली व घटस्फोटाची मागणी केली. तसेच, घटस्फोट दिला नाही तर जिवे मारण्याचीही धमकी दिली.

६. अर्जदाराचे पुढे कथन की, अर्जदार हिला उत्पन्नाचे काहीही साधन नाही. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची, औषधपाणी, कपडालत्ता याची काहीही तजवीज, व्यवस्था केली नाही. सामनेवाला क्र.१ हा ड्रायव्हर म्हणून नोकरी करत असून त्याला दरमहा सुमारे रु.२०,०००/– पेक्षाही जास्त पगार मिळतो. सामनेवाला क्र.१ याची वयगांव, ता. वाई येथे वडीलोपार्जित सुमारे दोन एकर बागायती शेती असून शेतीपासून खर्च वजा जाता वार्षिक सुमारे रु.२,००,०००/– एवढे उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र.१ याच्यावर अन्य कोणीही अवलंबून नाही अगर त्याच्यावर अन्य कोणाचीही जबाबदारी नाही. सामनेवाला क्र.१ याची आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली असून अर्जदार हिचे मागणीप्रमाणे त्याची पोटगी देण्याची ऐपत आहे. सबब, सामनेवाला क्र.१ यांचेकडून अर्जदार यांना रक्कम रु.५,०००/– दरमहा तूर्तातूर्त पोटगी मिळावी, अशी विनंती केली

आहे.

७. प्रस्तुत अर्जाची नोटीस सामनेवाला क्र.१ व २ यांना बजावण्यात आलेली आहे. सामनेवाला हे प्रस्तुत अर्जाचेकामी हजर झाले नाहीत. सबब, प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द एकतर्फा चालवण्यात येत आहे.

८. अर्जदारतर्फे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे निकालासाठी पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदवण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिचेवर घरगुती हिंसाचार झाल्याचे अर्जदार प्रथमदर्शनी शाबित करते काय ? | **.. होय ..** |
| २. | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **.. होय ..**<br>**दरमहा रक्कम रु.४०००/-.** |
| ३. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता :-**

९. सामनेवाला यांनी अर्जात हजर होवूनदेखील त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे, अर्जदार यांनी अर्जात केलेली कथने प्रथमदर्शनी शाबित होतात. अर्जदार यांचे सामनेवाला क्र.१ यांचेसोबतचे विवाह संबंध सामनेवाला यांनी म्हणणे दाखल करुन नाकारले नसल्यामुळे कायम आहेत असे गृहित धरण्यात येते. अर्जदार यांना सांभाळण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी ही सामनेवाला यांची आहे, ती त्याला टाळता येणार नाही. अर्जातील कथनानुसार अर्जदार हिचा स्वतःचा चरितार्थ चालवण्यासाठी तसेच औषध

पाण्यासाठी पैशांची आवश्यकता आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते.

१०. अर्जदार यांनी सामनेवाला यांच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा दाखल केलेला नाही असे असतानाही सामनेवाला क्र.१ यास कोणतेही अपंगत्व नाही. तो कामधंदा करण्यास सक्षम असल्याचे गृहीत धरण्यास हरकत नाही. सदर सामनेवाला हा मोल मजूरी करुन दरमहा रक्कम रु.१५,०००/– ते रु.२०,०००/– असे गृहित धरले तरी वावगे ठरणार नाही. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिस रु.४,०००/– दरमहा दरम्यानची पोटगी देण्यास सक्षम आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हीस दरमहा रक्कम रु.४,०००/– दरमहा अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुत अर्जाच्या दाखल तारखेपासुन द्यावी.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2024.06.03 15:59:00 +0530

**ठिकाण** – मेढा

**दिनांक** – ०३.०६.२०२४

रविंद्र भ. खवले,
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा**

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : Abhilash Sanjay Bagal |
| Court Name | : R. B. Khawale, J.M.F.C., Medha. |
| Order Date | : 03.06.2024 |
| Order signed by presiding officer on | : 03.06.2024 |
| Order uploaded on | : 04.06.2024 |